आर्थिक उन्नतीची दिशा, तीन दिवशीय भरगच्च बचत गट प्रदर्शनीचा समारोप; करोडोंची उलाढाल >>पान 2

पत्रकारांवरील हल्ल्यांविरोधात महाराष्ट्रभर आंदोलनांचा लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचा ईशारा >>पान 3

ज्यांच्या सोबत संघर्ष केला त्यांच्यासोबतच उद्धव ठाकरे बसले >>पान 4


# दैनिक आपला विदर्भ

**सुविचार**

नास्तिक मनुष्य हा आस्तिक मनुष्याइतकाच धार्मिक असतो. – केदार जोशी

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



एकदा समोर ये हरामखोर, पुष्कर जोगच्या नव्या सिनेमाचा ट्रेलर, फुल्ल सस्पेन्स

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 62 ■ मंगळवार, दि. 08 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# राज्याला सक्षम करण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुती सरकारने केले : खा.डॉ.श्रीकांत शिंदे

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : मेहकर येथे शिवसेना जनसंवाद दौऱ्यानीमित्त आयोजित स्वातंत्र्य मैदानावरील विशाल जाहीर सभेत डॉ .श्रीकांत शिंदे म्हणाले की, एकनाथ शिंदे हे संवेदनशील मुख्यमंत्री आहेत .ते स्वतःला कार्यकर्ते समजतात .दिवसरात्र कामात गुंतून असतात .राज्यातील लोकांचे ते लाडके मुख्यमंत्री आहेत,असे सर्वत्र दिसते. मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखील महायुती सरकारने राज्याला सक्षम करण्याचे काम केले आहे.**







ते पुढे म्हणाले की, संगणक परीचारकांच्या मानधनात लवकरच वाढ होणार असल्याचे संकेत आहेत. घरी बसून राज्य चालवणाऱ्या पूर्वीच्या मुख्यमंत्र्यांना लोकांनी घरी बसवले. त्यांची लायकी येत्या विधानसभा निवडणुकीत त्यांना लोक दाखवतील.एकनाथ शिंदे लोकांचे अपार प्रेम लाभलेले एकमेव मुख्यमंत्री आहेत. हात दाखवा मुख्यमंत्री थांबवा , असे मुख्यमंत्री आहेत.ते सतत लोकांच्या गर्दीत असतात. शेकडो योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्र सक्षम करण्याचे काम बाळासाहेबांच्या विचारावर चालून एकनाथ शिंदे यांनी केले. व्यासपीठावर माजी खासदार संजय निरुपम , शशिकांत खेडेकर ,आमदार भावना गवळी , विठ्ठल सरप, यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आपल्या भाषणात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, माझ्यासारख्या शेतकरी कुटुंबातील खासदाराला केंद्रीय मंत्री मुख्यमंत्री शिंदे यांनी केले.उध्दव



ठाकरे यांनी दोन आमदारांच्या मंत्री पदाच्या संधी डावलून स्वतःच्या मुलाला मंत्री केले.मी नऊ वेळा शिवसेना पक्ष व धनुष्यबाण चिन्ह घेऊनच लढलो. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना हीच खरी शिवसेना आहे. शिंदे व महायुती सरकारने राज्यातील सर्व समाज घटकांना शेकडो योजनांच्या माध्यमातून भरभरून दिले. पूर्वी तीस टक्के शेतकरी पीकविमा भरत होते ,आता एक रुपयात पीकविमा असल्याने सर्व शेतकरी प्रस्ताव भरत आहेत.लाडकी बहिण योजनेसाठी ४६ हजार कोटींची तरतूद केली.पंतप्रधान मोदीजी हे देशाला गतीने प्रगतीकडे नेत आहेत. विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठ्या संख्येने मतदान करून पुन्हा हेच सरकार आणण्याचे त्यांनी आवाहन केले. आमदार संजय रायमुलकर म्हणाले की , मतदारसंघाच्या विकासासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मोठी मदत झाली.

शेतकरी,महिला वर्गाला त्यांनी विविध योजनांच्या माध्यमातून भरीव आर्थिक मदत केली. उबाठा च्या एका नेत्याने मेहकर गद्दारांचे शहर आहे ,असे म्हटले ,त्याचा मी निषेध करतो. यावेळी भाऊसाहेब चौधरी यांचे भाषण झाले.यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बळीभाऊ मापारी, जिल्हा उपप्रमुख राजेंद्र गाडेकर, तालुका प्रमुख सुरेशतात्या वाळूकर,भगवानराव सुलताने, शहर प्रमुख जयचंद बाठीया, बाजार समिती सभापती माधवराव जाधव, युवासेनेचे जिल्हा प्रमुख ऋषिकेश जाधव, नीरज रायमुलकर, केशवराव जागृत, भूषण घोडे, भगवानराव, राठोड,नितीन राऊत, हर्षल कुसळकर,हर्षल गायकवाड, कोकाटे, महिला आघाडीच्या मायाताई म्हस्के, कविताताई दांदडे,अंजली गवळी, वैशालीताई सावजी, दत्ता खरात, मनोज जाधव, बबनराव भोसले, रामराव म्हस्के, बबनराव तुपे, मनोज जाधव, पिंटू सूर्जन, भास्करराव राऊत, हिंमतराव सानप, डॉ. काशिनाथ घुगे, रविराज रहाटे, गजेंद्र मापारी, आशाताई झोरे, अक्काताई गायकवाड, गणेश बोचरे,नंदु बंगाळे प्रामुख्याने उपस्थित होते.सभेला प्रचंड गर्दी झाली होती. कार्यक्रमाचे संचालन जयचंद बाठीया यांनी केले.

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगामार्फत १० ऑक्टोबर रोजी सुनावणी

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगामार्फत गुरुवार, दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, प्रशासकीय इमारत (डेअरी विभाग), पहिला मजला, अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई येथे सुनावणी होणार आहे. अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील अर्जदारांच्या तक्रारींवर आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांच्याकडे सुनावणी होणार आहे. संबंधित अर्जदार व संबंधित शासकीय, निमशासकीय, जिल्हा परिषद, महानगरपालिका यांच्या बाबतीत तक्रारींच्या अनुषंगाने सुनावण्यांचे आयोजन करण्यात आलेले आहे, असे महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य सचिव संजय कमलाकर यांनी कळविले आहे.




## तुळजापूरदर्शन करून परतताना अपघातात कोल्हापूरच्या दोघा तरुणांचा मृत्यू; तिघे जखमी

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** नवरात्रोत्सवानिमित्त तुळजापुरात तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन गावी परत जाताना तरुण भाविकांच्या मोटारीला अपघात होऊन त्यात दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य तिघेजण जखमी झाले. सोलापूर–कोल्हापूर महामार्गावर सांगोला तालुक्यातील चिंचोली बाह्यवळणावर पहाटे हा अपघात झाला. यातील मृत व जखमी सर्वजण कोल्हापूर जिल्ह्यातील राहणारे आहेत.

सुखदेव बामणे (वय ४०) आणि नैनेश कोरे (वय ३१, दोघे रा. नांदणी, जि. कोल्हापूर) अशी दोघा मृतांची नावे आहेत. जखमींमध्ये सुरज विभूते (रा. कुठली, जि. कोल्हापूर), शिवानंद कोरे (वय ३५, रा. वडगाव, जि. कोल्हापूर) आणि सुधीर चौगुले (वय ३५, रा. नांदणी) यांचा समावेश आहे. जखमींना वैद्यकीय उपचारासाठी सांगोला येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या जोराच्या अपघातात सुखदेव बामणे आणि नैनेश कोरे हे दोघे मृत मोटारीतून बाहेर फेकले गेले. रस्त्यावर हाडा मांसांचा सडा पडला होता. हे सर्वजण नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून रविवारी रात्री कोल्हापूरहून तुळजापुरला तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन घेऊन कोल्हापूरकडे परत जात असताना त्यांची भरधाव मोटार (एमएच ०९ एफबी ३९०८) पाठीमागून २६ चाकी मालमोटारीवर (एम पी २० झेडएम ९५१८) जोरात आदळली. ही मालमत्ता सांगोल्यातून डाळिंब भरून कोल्हापूरच्या दिशेने जात होती. अपघाताची माहिती कळताच सांगोला पोलिसांनी चिंचोली बाह्य वळणावर अपघातस्थळी धाव घेतली.

## नाशिकच्या ब्रह्मगिरी पर्वत परिसरातून १० मुस्लीम तरुण पोलिसांच्या ताब्यात

**नाशिक/प्रतिनिधी :** येथील त्र्यंबकेश्वरला १० मुस्लीम तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याने एकच खळबळ उडाली आहे. ब्रह्मगिरी पर्वत परिसरात मोबाईलमध्ये हे तरुण चित्रीकरण करत आहेत. संशयास्पद हालचाली वाटल्याने स्थानिक नागरिकांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी तरुणांना ताब्यात घेतले असून त्यांनी चौकशी केले जात आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, आज सकाळी ब्रह्मगिरी पर्वत परिसरात केरळमधील १० मुस्लीम तरुण आपल्या मोबाईलमध्ये चित्रीकरण करत असताना आढळून आले. स्थानिक नागरिकांनी त्यांना हटकण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी या तरुणांनी स्थानिक नागरिकांना उडवा उडवीची उत्तरे दिली.

त्यानंतर स्थानिक नागरिकांनी याबाबतची माहिती पोलिसांना दिली असता पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी या दहा तरुणांना ताब्यात घेतले आहे. त्यांना चौकशीसाठी त्र्यंबकेश्वरच्या पोलीस ठाण्यात नेण्यात आले आहे. त्यांच्याकडे असलेल्या कागदपत्रांची आणि मोबाईलची तपासणी केली जात आहे.

## राहुल गांधींच्या दौऱ्यानंतर चार दिवसातच मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री बुधवारी कोल्हापुरात

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापुरातील कसबा बावड्यातील शिवरायांचा पुतळा अनावरण आणि संविधान संमेलन दौरा काँग्रेस जिल्हाध्यक्ष आमदार सतेज पाटील यांनी अत्यंत दिमाखदारपणे करून दाखवल्यानंतर आता महायुतीकडून सुद्धा येत्या बुधवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दौरा यशस्वी करण्यासाठी जंगी तयारी करण्यात येणार आहे. बुधवारी ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजता तपोवन मैदानावर होत असलेला मेळावा यशस्वी करण्याचे आवाहन कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केलं आहे.



दरम्यान, कोल्हापुरातील शेंडापार्कमधील ११०० खाटांच्या रुग्णालयाचे भूमिपूजन, जिल्हा बँक विस्तारित इमारतीचे उद्घाटन व मेळाव्याच्या नियोजनासाठी रविवारी कोल्हापुरात बैठक घेण्यात आली. मुश्रीफ यांनी सांगितले की, कोल्हापुरातील सामान्य माणसाला उपचारासाठी बाहेर जाण्याची गरज भासू नये, यासाठी प्रशस्त रुग्णालय मंजूर केलं आहे. विविध वैद्यकीय महाविद्यालये सुरू करत आहोत, इतकी चांगली आरोग्य सेवा पश्चिम महाराष्ट्रात कोठेही नाही. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री कोल्हापुरात येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत मेळावा होत आहे. यावेळी खासदार धनंजय महाडिक, माजी खासदार संजय मंडलिक उपस्थित होते.

# अजित पवार शिरूरमधून लढणार?

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** बारामती विधानसभा मतदारसंघातून निवडणूक न लढविण्याचे संकेत देणारे उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार शिरूर मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची शक्यता आहे. शिरूर मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात असल्याने त्या दृष्टीने अजित पवार यांनी चाचपणी सुरू केली आहे. त्यामुळे या मतदारसंघातील लढत अजित पवार विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार) पक्षाचे विद्यमान आमदार अशोक पवार अशी होण्याची शक्यता आहे.

उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी बारामती विधानसभेची जागा न लढण्याचे संकेत बारामती येथील मेळाव्यात गुरुवारी दिले होते. 'मी उमेदवार देईन, त्यालाच निवडून द्या,' असे सूचक वक्तव्य पवार यांनी केले होते. त्यामुळे बारामतीचा उमेदवार कोण असेल, याचबरोबर अजित पवार कोणत्या मतदारसंघातून निवडणूक लढविणार, याबाबत राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू होती. मात्र, अजित पवार यांनी शिरूर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने चाचपणी सुरू केल्याचे पुढे आले आहे. राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या सूत्रांकडूनही त्याला दुजोरा देण्यात आला. कर्जत–जामखेड मतदारसंघातूनही अजित पवार निवडणूक लढवतील, अशी चर्चा सातत्याने होत होती. मात्र, शिरूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याबाबत पवार सकारात्मक असल्याचे राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या सूत्रांकडून सांगण्यात आले.

लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना पराभव स्वीकारावा लागला होता. हा पराभव अजित पवार यांच्या जिव्हारी लागला आहे. त्यामुळे दोन महिन्यांपूर्वी, त्यांनी 'बारामतीमधून निवडणूक लढविण्यात आता रस राहिलेला नाही,' असे विधान करतानाच, 'कार्यकर्त्यांची मागणी असेल आणि संसदीय समितीने मान्यता दिली तर, जय पवार यांना बारामतीमधून उमेदवारी दिली जाईल,' असे स्पष्ट केले होते. मात्र, त्यांच्या या विधानानंतर पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी, 'बारामती हा अजित पवार यांचा डीएनए आहे. ते बारामतीमधूनच लढतील,' असे स्पष्ट केले होते.



शिरूर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे अशोक पवार विद्यमान आमदार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि आमदार अशोक पवार यांनी शरद पवार यांच्या समवेत राहण्याचा निर्णय घेतला होता. लोकसभा निवडणुकीपूर्वी शिरूरमध्ये झालेल्या मेळाव्यात त्यावरून अजित पवार यांनी विद्यमान खासदार आणि आमदारांना आव्हान दिले होते. 'मंत्रिपद तर लांबच, आमदारच कसे होतो ते मी पाहतोच,' असा इशारा अजित पवार यांनी आमदार अशोक पवार यांना दिला होता. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी शिरूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविल्यास अशोक पवार यांच्यापुढे मोठे आव्हान असणार आहे.

## ‘नवरात्री’ हे शक्ती जागरणाचे पर्व

नवरात्री’ हे शक्ती जागरणाचे पर्व आहे. ज्या वेळेला बलाढ्य भाव लागला नाही, देवराज इंद्र पराभूत झाला, त्यावेळेला सर्व देवतांनी एकत्र येऊन स्त्री देवतेची प्रार्थना केली. त्यांच्या समोर जी मूर्ती साकार झाली त्या प्रतिमेला त्यांनी आपापल्या जवळच्या सर्वोच्च शक्ती दिल्या. भगवान शंकरांनी आपले त्रिशूल दिले. भगवान विष्णूंनी आपले सुदर्शन चक्र दिले. इंद्राने आपले वज्र दिले. वरुणाने आपली गदा दिली. अशा सर्व प्रकारांच्या आयुधांनी ती देवी सज्ज झाली... त्यानंतर महिषासुराच्या एकापेक्षा एक बलाढ्य राक्षसांचा तिने पराभव केला. महिषासुर देवीला म्हणतो, ’तुझ्यासारख्या सुंदर स्त्रीला मारणे मला शक्य होणार नाही. त्यामुळे तू माझ्याशी लग्न कर.’ महिषासुरमर्दिनी त्याला म्हणाली, ’मी तुझ्यासाठी वधू म्हणून आलेली नाही. मी तुझ्यासाठी तुझा मृत्यू म्हणून आलेली आहे. त्यामुळे हुशार असशील, समज असेल तर तू आतासुद्धा युद्धातून पाय मागे घेऊ शकतो. अन्यथा तुझा मृत्यू निश्र्चित आहे.’ महिषासुरमर्दिनी दुर्गेचे महिषासुरासोबत नऊ दिवस आणि रात्र युद्ध झाले आणि त्या युद्धामध्ये महिषासुराचे निर्दालन झाले. महिषासुराचे निर्दालन जरी दुर्गेने केले असले, तरी शक्तिस्वरूपा दुर्गे ला आयुधांनी सज्ज करण्याचे काम देवांनी केलेले होते. देवांनी आपल्या जवळची सर्वोच्च शक्ती दुर्गेला दिली. ’देव जुटे यत्नो मे सब, असुर निवारण शेष है ।’ त्यानंतर दुर्गा महिषासुरमर्दिनी होऊ शकली. प्राचीन काळापासून दैवी शक्ती आणि आसुरी शक्ती यांचा संघर्ष सुरू आहे. असुर मायावी आहेत. त्यांच्याजवळ शक्ती आहे. ते देवांना पराभूत करण्याचा सतत प्रयत्न करीत असतात. देव आणि दानवांचे तुंबळ युद्ध सातत्याने सुरू असते. परंतु, देवांना कठोर परिश्रम केल्याशिवाय विजय मिळत नाही, हे सत्य आहे. आज महिषासुरमर्दिनी दुर्गेच्या रूपामध्ये आम्ही जर भारतमातेची मूर्ती आपल्यासमोर आणली तर आपल्या असे लक्षात येईल की, आजही दैवी आणि असुर शक्तींचा संग्राम सुरूच आहे. असूर शक्ती फक्त भारतालाच प्रताडित करीत आहेत, त्रास देत आहेत असे नाही तर विश्र्वातील मानवतेला त्यांचा त्रास आहे. भारतमातेला शक्ती संपन्न करण्यासाठी देवांनी म्हणजे समाजातील सज्ञनशक्तीने आपले सर्वोच्च योगदान देणे आवश्यक आहे. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, काही प्रमाणात अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपानसारख्या देशांमध्ये इस्लामी दहशतवाद पसरलेला आहे. इंग्लंडमधील काही शहरांमध्ये तर मुस्लिम व्यक्ती तिथला महापौर बनू शकतो अशा पद्धतीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. अनेक शहरांत भारतामध्ये जशी परिस्थिती असते तशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. तिथल्या मुस्लिमबहुल शहरांमध्ये तिथल्या ख्रिश्र्चन आणि इतर धर्मीय लोकांना आपला धर्म सांभाळणे आणि आपल्या सुरक्षिततेला सांभाळणे हे एक कठीण कार्य होऊन बसलेले आहे. हमास आणि इस्रायलचे युद्ध सुरूच आहे. इराण दहशतवादाचे पोषण करीत आहे. पाकिस्तानच्या जन्मापासून पाकिस्तानने भारताविरुद्ध युद्ध मांडले. भारताची कुठलीही चूक नसताना किंवा युद्धाची प्रवृत्ती नसताना भारतामध्ये दहशतवाद माजविला. मागच्या १० वर्षांमध्ये मोदी सरकार आल्यावर या दहशतवादावर अंकुश बसला. तरीही या वेळेला २४० जागा मिळाल्यावर काश्मीरमध्ये छोट्या- मोठ्या का होईना, परंतु दहशतवादाच्या घटना घडू लागल्या आहेत. यावरून लक्षात येईल की, देशामध्ये सरकारच्या पाठीमागे संघटित आणि बलशाली समाज नसेल तर ते सरकार दुबळे ठरते. पंतप्रधान कितीही ५६ इंची छातीचा असला, तरीही त्याच्या मागे उभा असलेला समाज जर संघटित नसेल, दहशतवादाच्या विरोधात कटिबद्ध नसेल, भारतभक्त नसेल तर तो नेतासुद्धा फार काही पराक्रम गाजवू शकणार नाही. त्यामुळे भारतातील जो समाज निवडणुकीच्या काळामध्ये जाती-पातीमध्ये योजनापूर्वक विभागला जातो, त्या समाजाने आता जागृत होण्याची आवश्यकता आहे व राष्ट्रीय दृष्टिकोन ठेवून मतदान करण्याची आवश्यकता आहे. येणाऱ्या काळामध्ये विधानसभेच्या निवडणुका आहेत. स्थिर महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र, संघटित महाराष्ट्र, जाती द्वेषविरहित महाराष्ट्र यासाठी लोकांनी विवेकबुद्धीने मतदान करणे आवश्यक आहे. भारतातील निवडणुका या केवळ भारताच्या राहत नाही तर यामध्ये विदेशी शक्तीचाही प्रभाव असतो. विदेशी शक्तींना जे सोयीचे आहेत अशा लोकांना निवडून आणण्यासाठी त्यांचं धन आणि बल कार्य करीत असतं. या त्यांच्या धन आणि बलाला केवळ जागृत, संघटित, समाजशक्तीच पराभूत करू शकते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. नवरात्रीचे हे शक्ती जागरणाचे पर्व आहे. आज घरोघरी कुमारिकांचे पूजन सुरू आहे. परंतु जो देश कुमारिकांचे पूजन करतो, जो देवतेला स्त्री स्वरूपात पूजतो; त्या समाजामध्ये कोलकात्यासारख्या घटना घडतात, याचा सुज्ञ समाजाने विचार करण्याची आवश्यकता आहे. या देशामध्ये कधीतरी श्रद्धाचे तुकडे करून ते जंगलात फेकून देण्यात येतात तर कधी महालक्ष्मीचे तुकडे करून ते फ्रीजमध्ये भरण्यात येतात. या घटना पाहिल्या की, दुर्गेची उपासना करणारा समाज हाच का? असा प्रश्र्न पडतो. आदर्श केवळ पुस्तकात असून चालणार नाही तर तो समाजाच्या जीवनामध्ये असला पाहिजे. ’लव्ह जिहाद’च्या नावाखाली तरुणींचे बळी पडणे थांबविले पाहिजे आणि बळी पडणाऱ्यांची जागा तुरुंगात झाली पाहिजे. उत्तरप्रदेशच्या योगी सरकारने ज्याप्रमाणे लव्ह जिहादच्या विरोधात कायदा केला आहे तसा कायदा सर्वच राज्यांमध्ये झाला पाहिजे. कुठला तरी अफजल नाव बदलून पाच पाच तरुणींशी विवाह करतो. हे थांबविले गेले पाहिजे. महिषासुराने दुर्गेला विवाहाचे निमंत्रण पाठविले होते. परंतु दुर्गेने जे उत्तर दिले, ’मी तुझी वधू नाही, तुझा मृत्यू आहे!’ हेच उत्तर आजच्या तरुणींनी असा लव्ह जिहादचा खेळ करणाऱ्यांना दिले पाहिजे, असे वाटते. देवांनी जसे महिषासुराच्या संहारासाठी प्रयत्न केले तशाच पद्धतीचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. जातिभेद विद्वेषविरहित बलाढ्य समाज उभा करण्यानेच शक्ती निर्माण होणार आहे. यातूनच देवांना म्हणजे सज्ञनशक्तीला विजय मिळणार आहे. याची आठवण नवरात्रीच्या शक्ती जागरण पर्वाच्या निमित्ताने ठेवणे आवश्यक आहे.

# आर्थिक उन्नतीची दिशा, तीन दिवशीय भरगच्च बचत गट प्रदर्शनीचा समारोप; करोडोंची उलाढाल

## ‘जयश्रीताईंनी’ ग्रामीण महिलांचा आत्मविश्वास वाढविण्याचे काम केले - भाईजी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** दिशा बचत गट फेडरेशनचे कार्य कौतुकास्पद आहे. ग्रामीण महिलांना आत्मविश्र्वास देण्याचे काम जयश्रीताईंनी केले आहे. असे प्रतिपादन बुलढाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांनी महिला उद्योजक तथा बचत गट प्रदर्शनीच्या समारोपीय कार्यक्रमात केले.

बुलढाणा येथे तीन दिवशीय भव्य बचत गट प्रदर्शनीचे आयोजन दिशा बचत गट फेडरेशनच्या माध्यमातून जयश्रीताई शेळके यांनी बुलडाणा येथे केले होते. त्याचा समारोप काल पार पडला. या प्रदर्शनीमध्ये तळागाळातील महिलांची उस्फुर्त उपस्थिती लाभली. महिलांनी आणलेले गृह उपयोगी पदार्थ, खाद्य पदार्थांची रेलचेल, बचत गटाच्या महिलांचे विविध स्टॉल,त्यामध्ये झालेली करोडो रुपयांची उलाढाल पाहता ’दिशाचे’ आयोजन कमालीचे यशस्वी ठरले. समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयश्रीताई शेळके होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून बुलढाणा अर्बन चे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष गणेश पाटील, स्नेहलता मानकर, माधवी जवरे, ॲड. अनुराधा वावगे, भाऊसाहेब शेळके, के. एस.बोरे व इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली. यावेळी प्रदर्शनीमध्ये भाग घेणाऱ्या काहीमहिलांचे सत्कार मान्यवरांच्या हस्ते पार पडले. यावेळी बचत गटाच्या महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले.






### ताई खूप मोठ्या व्हा, आम्ही सोबत आहोत

महिलांनी व्यक्त केली भावना यावेळी प्रदर्शनी मध्ये सहभागी झालेल्या महिलांनी यशस्वी आयोजनाबद्दल जयश्रीताई शेळके यांचे आभार मानले. जयश्रीताई यांच्या बद्दल महिला भरभरून बोलल्या. ताई तुम्ही खूप काही दिलं ...तुम्ही सर्वसामान्य माणसांमध्ये सहज मिसळता, कुठला बडेजाव नाही वा कुठला संकोचही नाही, समोरच्याला आर्थिक उन्नतीचा विश्र्वास तुम्ही देता, तुम्ही दिलेली ऊर्जा घेवून आम्ही जात आहे. महिलांनी घरातून बाहेर पडून आर्थिक उन्नतीचा मार्ग धरला पाहिजे हा मूलमंत्र तुम्ही दिल्यामुळे महिलांना आर्थिक प्रगतीची दिशा मिळाली. असा सूर यावेळी मनोगतातून महिलांनी व्यक्त केला. यावेळी उपस्थित मान्यवर यांनीही मनोगत व्यक्त केले.

### महिलाच उद्याची नवी दिशा ठरविणार - ॲड.जयश्री शेळके

दिशा बुलडाणा जिल्हा महिला बचत गट फेडरेशनच्या माध्यमातून असंख्य महिला उद्योजक निर्माण होऊन त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. ह्याच महिला उद्याची ताकत आणि नवी दिशा घेऊन समोर येतील असा विश्र्वास जयश्री शेळके यांनी व्यक्त केला. तसेच ज्या महिलांनी प्रदर्शनीमध्ये सहभाग घेऊन प्रदर्शनी यशस्वी करण्यासाठी आपले योगदान दिले. अशा सर्व महिलांचे जयश्री शेळके यांनी आभार मानले.

### करोडोंची खरेदी - विक्री

बचत गट प्रदर्शनी मध्ये महिलांनी बनवलेल्या घरगुती वस्तू, विविध खाद्यपदार्थ, कपडे, आदींची रेलचेल बघायला मिळाली. संध्याकाळी खाद्य जत्रेवर तर अक्षरशा: झुंबड पडली होती. शहरातील प्रतिष्ठित नागरिकांनी कुटुंबासह या ठिकाणी येऊन भोजनाचा आस्वाद घेतला. आवळ्यापासून बनवलेले विविध पदार्थ, जाम, लोणचे , पापड, आदी पदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री झाली. तीन दिवसांमध्ये करोडो रुपयांची खरेदी विक्री झाल्याचे सांगितले जाते.त्यामुळे बचत गट प्रदर्शनी महिलांसाठी हक्काची बाजारपेठ ठरली.

# लोकसभा निवडणुकीत अजित पवारांना गुलिगत धोका; भाषणाला सुरुवात होताच हर्षवर्धन पाटलांचा गौप्यस्फोट

दैनिक आपला विदर्भ

**इंदापूर/प्रतिनिधी :** सुप्रिया सुळे या आमच्या भगिनी आहेत. त्या संसदरत्न खासदार असल्याचा आम्हाला अभिमान आहे. सुप्रिया सुळे या चारवेळा खासदार झाल्या. तुम्ही तीनवेळा खासदार होण्यात आमचा प्रत्यक्षपणे थोडाफार सहभाग होता. तर चौथ्यावेळी झालेल्या निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्या विजयात आमचा अदृश्य सहभाग होता, असा गौप्यस्फोट भाजपचे माजी नेते हर्षवर्धन पाटील यांनी केला. हर्षवर्धन पाटील यांनी आपली कन्या अंकिता पाटील आणि कार्यकर्त्यांसह सोमवारी इंदापूरमध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमात शरद पवार गटात प्रवेश केला. यावेळी व्यासपीठावर विजयसिंह मोहिते-पाटील, धैर्यशील मोहिते पाटील, सुप्रिया सुळे, जयंत पाटील, अमोल कोल्हे, उत्तमराव जानकर अशा बड्या नेत्यांची हजेरी होती.

यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी आपल्या भाषणात एक गुपित उघड केले. लोकसभा निवडणुकीवेळी हर्षवर्धन पाटील हे भाजपमध्ये होते.



त्यांचा इंदापूर मतदारसंघ हा बारामती लोकसभेचा भाग आहे. लोकसभेला बारामतीमधून अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या महायुतीच्या उमेदवार होत्या. मात्र, अजित पवार आणि हर्षवर्धन पाटील यांच्यात ३६ चा आकडा असल्यामुळे ते लोकसभा निवडणुकीत अजित पवारांना कितपत मदत करतील, याबाबत साशंकता होती. मात्र, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिष्टाई करत अजित पवार आणि हर्षवर्धन पाटील यांच्यात समेट घडवून आणला होता. त्यामुळे हर्षवर्धन पाटील लोकसभा निवडणुकीला सुनेत्रा पवार यांना मदत करण्यास तयार झाले होते. मात्र, प्रत्यक्षात पडद्यामागून सुप्रिया सुळे यांना मदत केल्याची कबुली जाहीरपणे हर्षवर्धन पाटील यांनी दिली. यानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केल्याचे पाहायला मिळाले.



भाषणाच्या सुरुवातीला हर्षवर्धन पाटील यांनी शरद पवार आणि जयंत पाटील यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की, जयंत पाटील म्हणायचे का थांबला आहात या इकडे. कार्यकर्त्यांनी आग्रह धरला आणि आम्ही सगळ्यांनी पक्ष प्रवेश केला. आम्हाला काही मिळावं म्हणून आम्ही निर्णय घेतला नाही. जी जबाबदारी आमच्यावर टाकायची आहे ती टाका. आत-बाहेर करणाऱ्यांपैकी मी नाही. मला लोकांनी विचारलं पक्ष का बदलला? पक्षापेक्षा जनता श्रेष्ठ. जनतेनं जे म ला सांगितलं ते आजपर्यंत मी केलं. देवेंद्र फडणवीस यांना माझ्या अडचण सांगितल्या त्यांनी त्यांची अडचण सांगितली. त्यांनी सांगितले, हे देतो ते देतो..पण त्यांना सांगितले आमची लोकं त्या पलीकडे गेली आहेत, असे हर्षवर्धन पाटील यांनी म्हटले.

१० वर्षात इंदापूरमध्ये खूप अन्याय झाला. कोणतेही काम टक्केवारी दिल्याशिवाय होत नाही. त्यामुळे इंदापुरात परिवर्तन झाल्याशिवाय राहणार नाही. काल बिग बॉसचा निर्णय झाला आणि बिग बॉस बारामतीचा झाला. साहेब तुम्ही बिग बॉस आहात. साहेब तुम्ही निर्धास्त राहा आम्ही जबाबदारी स्वीकारतो. ताई माझी विनंती आहे की, तुमच्या लोकांनी मला समजून घ्यावे. साहेब कधी आमच्या कुटुंबावर बोलले नाहीत. आम्ही कधी त्यांच्यावर बोललो नाही. आमचं दुखणे वेगळं होतं ते बाजूला गेलं, असे हर्षवर्धन पाटील यांनी म्हटले.

### छत्रपती संभाजीनगरमध्ये हजारोंच्या संख्येने बौद्ध अनुयायी रस्त्यावर

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरच्या बुद्धलेणीच्या पायथ्याशी असलेल्या विहार आणि विपश्यना केंद्राला अतिक्रमित असल्याचे सांगत नोटीस देण्यात आल्याचा प्रक्रर घडला होता. आता या प्रकरणाच्या विरोधात आज भिक्खू संघ, उपासक आणि आंबेडकरी समुदाय आक्रमक झाला असून त्यांनी या कारवाईचा निषेध नोंदविला आहे. यासाठी शहरातील क्रांती चौक ते विभागीय आयुक्तालयापर्यंत भव्य मोर्चा काढण्यात येत आहे.

या मोर्चात लाखोंच्या संख्येने बौद्ध अनुयायी सहभागी होणार असून, इतरधर्मीय नागरिकदेखील मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी होतील, असा दावा करण्यात आला आहे. तर मोर्चाच्या पार्श्वभूमीवर शहरातील शाळांना सुट्टी देण्यात आली आहे. सोबतच विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांनाही आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला.

# एकदा समोर ये हरामखोर, पुष्कर जोगच्या नव्या सिनेमाचा ट्रेलर, फुल्ल सस्पेन्स

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून सायबर गुन्हेगार ’’डिजिटल अरेस्ट’’चा वापर करत आहेत. ऑनलाइन पद्धतीने सायबर गुन्हेगारांच्या तावडीत अडकल्यानंतर लाखो रुपयांचं नुकसान झाल्याच्या अनेक घटना आतापर्यंत समोर आल्या आहेत. पण, आता उत्तर प्रदेशातील अग्रामध्ये ’डिजिटल अरेस्ट’शी संबंधित एक भीषण घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे सर्वांना धक्का बसला असून, नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. सायबर गुन्हेगारांनी एका शिक्षिकेला व्हॉट्सॲप कॉल करून तिची मुलगी सेक्स रॅकेटमध्ये अडकल्याची माहिती दिली. फोन करणाऱ्याने मुलीच्या सुटकेसाठी एक लाख रुपयांची म ागणी देखील केली. या कॉलमुळे संबंधित शिक्षिकेला इतका मोठा धक्का बसला की तिला जागीच हार्ट ॲटॅक आला. रुग्णालयात पोहोचेपर्यंत तिचा मृत्यू झाला. आपल्याबाबत अशा घटना घडू नयेत यासाठी काय केलं पाहिजे, याबाबत या ठिकाणी सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

दिल्ली पोलीस दलातील सायबरतज्ज्ञ किसलय चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही महिन्यांत असं निदर्शनास आलं आहे की, सायबर गुन्ह्यांसाठी गुन्हेगारांनी ’डिजिटल अरेस्ट’ ही नवीन पद्धत अवलंबण्यास सुरुवात केली आहे. हे लोक पोलीस, सीबीआय, सीआयडी किंवा बँकेचे कर्मचारी असल्याचं भासवून व्हॉट्सॲपवर ऑडिओ किंवा व्हिडिओ कॉल करतात. ते अशी वातावरण निर्मिती करतात की, समोरची व्यक्ती पूर्णपणे त्यांच्या व्हर्च्युअल जाळ्यात अडकते आणि त्यांच्या म्हणण्यानुसार वागते.

हे सायबर गुन्हेगार ’डिजिटल अरेस्ट’ केलेल्या व्यक्तीला व्हिडिओ कॉलद्वारे धमकावतात आणि प्रसंगी वाईट शिव्याही देतात. फोनवर असलेली व्यक्ती स्वत:, तिची मुलं किंवा नातेवाईक एखाद्या गैरप्रकारात अडकल्याची धमकी देतात. अशा परिस्थितीत लोक भीतीपोटी गुन्हेगारांना आपला आधार क्रमांक, अकाउंट डिटेल्स, ओटीपी, ईमेल पासवर्ड देतात. काही लोक तर स्वत: गुन्हेगारांना पैसे ट्रान्सफर करतात. अशा प्रकारचे सायबर गुन्हे करणारे हे लोक भारतातील आणि परदेशातील आहेत. ते अंदाजे लोकांना फसवण्याचा प्रयत्न करतात. अनेक लोक या हनी ट्रॅप घोटाळ्यात सहज अडकतात.

’या’ महत्त्वाच्या गोष्टी माहिती करून घेणं गरजेचं..

किसलय चौधरी म्हणाले, ’’’डिजिटल अरेस्ट’बाबत सम ोर आलेल्या सर्व केसेसमध्ये अनोळखी नंबरवरून किंवा व्हॉट्सॲपवरून कॉल्स आलेले आहेत. जर कोणी तुम्हाला अशा प्रकारे कॉल करून पोलीस स्टेशनमधून बोलत असल्याचं सांगत असेल तर त्यावर विश्वास ठेवू नका. गुन्ह्याशी संबंधित कॉल करताना पोलीस नेहमी सीयूजी नंबर किंवा लँडलाइन नंबरवरून कॉल करतात. पोलीस कधीही व्हॉट्सॲप कॉल करत नाहीत.’’

सुरक्षेसाठी पाळा हे नियम

- व्हॉट्सॲप, फेसबुक किंवा इन्स्टाग्रामवर अनोळखी नंबरवरून किंवा प्रोफाईलवरून कॉल आला तर तो उचलू नका.

- पोलिसांचा फोटो असलेल्या नंबरवरून कॉल येत असेल तर तो कॉल अजिबात रिसिव्ह करू नका.

- तुम्ही फोन उचलला तरी घाबरू नका. स्वत:बद्दल किंवा तुमच्या मुलांबद्दल कोणतीही माहिती शेअर करू नका. लगेच फोन बंद कट करा.

- पुन्हा कॉल येत असल्यास तो उचलण्याऐवजी पोलिसांना माहिती द्या.

- तुम्ही या नंबरवर एफआयआर दाखल करू शकत नसाल तरी तक्रार नक्कीच नोंदवू शकता.

लोक तक्रार दाखल करण्यासाठी पुढे येत नाहीत

किसलय म्हणाले की, अशा व्हॉट्सॲप कॉल्सची संख्या वाढत आहे. पण, पोलिसांकडे येणाऱ्या तक्रारी फारच कमी आहेत. लोक एकतर नंबर ब्लॉक करतात किंवा तो तसाच ठेवतात किंवा तो डिलीट करतात. पण, हा योग्य उपाय नाही. नागरिकांनी अशा नंबरचा तपशील पोलिसांना द्यावा. तक्रारीनंतर हा नंबर सायबर सेलमध्ये नोंदवला जातो आणि त्यावरून कॉल्स आले तर ते रेकॉर्ड करून गुन्हेगाराला अटक केली जाते. त्यामुळे पोलिसांकडे तक्रार करणं गरजेचं आहे.

पोलीस स्टेशनमध्ये न जाता करू शकता तक्रार

जवळच्या पोलीस स्टेशनम ध्ये जाऊन तक्रार नोंदवता येत नसेल तर तुम्ही ’१९३०’ या सायबर क्राइम हेल्पलाइन क्रमांकावर तुमची तक्रार नोंदवू शकता. याशिवाय, नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टलवरही तक्रार नोंदवू शकता. तिथेही तुमच्या तक्रारीला प्रतिसाद दिला जातो.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### नांदगाव तालुक्यातील माणिकपुंज धरण झालं ओव्हर फ्लो; आ. सुहास कांदे यांनी धरणावर जाऊन केलं जलपूजन



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/ प्रतिनिधी :** नांदगाव तालुक्यात असलेला माणिकपुंज धरण ओव्हर फ्लो होऊन वाहू लागल्यामुळे शिवसेना आमदार सुहास कांदे यांनी धरणावर जाऊन जलपूजन केले धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सलग दमदार पाऊस झाल्यामुळे दोन वर्षा नंतर धरण तुडुंब भरले आहे ३९५ दशलक्ष घनफूट साठवण क्षमता असलेल्या या धरणातून अनेक गावांची तहान भागविली जाते शिवाय शेकडो हेक्टर वरील जमिनीचं सिंचन या धरणाच्या पाण्यावर अवलंबुन आहे.धरण ओव्हरफ्लो झाल्यामुळे टंचाईचा सामना करणारे नागरिकां सोबत शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

### ललीत पंचमीनिमित्त आई तुळजाभवानीची रथालंकार पुजा



दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/ प्रतिनिधी :** तुळजापूर येथे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मंदिर संस्थान येथे शारदीय नवरात्र महोत्सवास ३ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे. आज ७ ऑक्टोबर रोजी महोत्सवाच्या पाचव्या माळेच्या दिवशी श्री तुळजाभवानी देवीजींच्या नित्योपचार पूजेनंतर रथ अलंकार महापूजा बांधण्यात आली.भगवान सुर्यनारायण यांनी त्रिलोक भ्रमणासाठी आपला रथ श्री तुळजाभवानी मातेस दिला.याप्रमाणे रथ अलंकार अवतार पूजा मांडण्यात येते,अशी आख्यायिका सांगितली जाते.

### राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत योजना; ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत योजनेतंर्गत जेष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन देण्यात येते. सुधारित शासन निर्णयानुसार कलावंताना ऑनलाईन अर्ज करण्याचे निर्देश आहे. त्यानुसार जेष्ठ साहित्यिक व कलावंतानी ऑनलाईन अर्ज दि. २८ ऑक्टोंबरपर्यंत परिपुर्ण प्रस्ताव तालुकानिहाय गटविकास अधिकारी येथे सादर करावा, असे आवाहन राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यीक व कलावंत मानधन सन्मान योजना समितीचे सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे. योजनेचा लाभ घेऊ इच्छीनाऱ्या कलावंतांनी https://mahakalasanman.org/pge-pplicationFromForUser.aspx या लिंकवर ऑनलाईन परिपुर्ण अर्ज भरलेल्या प्रस्तावाची प्रत प्रस्तावास जोडुन तालुकानिहाय गटविकास अधिकारी पंचायत समित्ती येथे अर्ज दोन प्रतित उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, बुलडाणा येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. अर्जातील नमुद अटींची पुर्तता करणाऱ्या व आवश्यक कागदपत्रांच्या छाननीअंतीच्या पुरावा कागदपत्रासह सादर केलेले वैध अर्ज स्विकारले जाईल. मुदतीनंतर येणारे अर्ज, अपुर्ण अर्ज, पुरावे नसलेले अर्ज किंवा पुर्वीचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

### 'मनालीचे फोटो शोधून दे', हे ऐकताच नवीन फीचर तुम्हाला शोधून देईल तुमचे फोनमधील फोटो

**मुंबई/प्रतिनिधी :** आजकाल फोनद्वारे फोटो काढण्याची मोठी क्रेझ आहे आणि सोशल मीडियाने त्याला आणखी प्रोत्साहन दिले आहे. लोक त्यांच्या आयुष्यातील खास क्षण कॅमेऱ्यात कैद करतात, जेणेकरून या आठवणी कायम राहतील. याशिवाय अनेक महत्त्वाची कागदपत्रेही फोनमध्ये असतात. परंतु शेकडो किंवा हजारो फोटोंमध्ये विशिष्ट फोटो शोधणे फार कठीण होते. लोक फक्त स्क्रोल करत राहतात, खूप मेहनत केल्यावर त्यांना फोटो मिळतात. पण आता गुगलचे नवीन फीचर तुम्हाला फोटो शोधण्यात मदत करेल.

# पत्रकारांवरील हल्ल्यांविरोधात महाराष्ट्रभर आंदोलनांचा लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचा ईशारा

■ पत्रकार प्राणघातक हल्ल्यातील आरोपींवर अॅट्रासिटी व पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणी ■ लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे जिल्हाधिकायांमार्फत गृहमंत्र्यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/ प्रतिनिधी :** ७,१०,२०२४अकोला जिल्ह्यात पत्रकारांवर हल्लयांची मालिका सुरु असतांनाच परभणी येथील लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे जिल्हा सचिव प्रमोद अशोकराव अंभोरे यांच्यावर जातीय द्वेषातून प्राणघातक हल्ला करणाऱ्या वर पत्रकार संरक्षण कायदा व अॅट्रोसिटी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी तसेच पत्रकारांवरील हल्ले थांबले नाही तर महाराष्ट्रभर आंदोलन छेडण्याचा ईशारा लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय देशमुख यांनी दिला आहे. यापुर्वी पत्रकारांवर प्राणघातक हल्ला झाला असतांना, महाराष्ट्रभर या घटनेचे प्रतिसाद उमटल्यानंतर देखिल गुन्हेगारावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही व थातूर मातूर गुन्ह्याची नोंद झाली.

३० सप्टेंबर २०२४ रोजी पातुर तालुक्यातील आलेगांवचे रहिवाशी असलेले पत्रकार सचिन मुर्तडकर यांच्यावर विवरा येथे प्राणघातक हल्ला करण्यात आला तो अद्यापही खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. परंतू आरोपी मोकाटच फिरत आहेत. सचिन मुर्तडकर तसेच परभणी येथील प्रमोद अंभोरे यांच्यावरील हल्ले झालेले आहेत. हे महाराष्ट्रभरात वाढत्या गुन्हेगारीची लक्षणे आहेत. पोलीसांचा वचक संपल्याने पत्रकारांवर हल्लयांमध्ये वाढ होत आहे. समाजातील चुकीच्या गोष्टी उघडकीस आणण्याचे काम करणाऱ्या पत्रकारांवर असे हल्ले होत असतील तर हा लोकशाहीचा चौथा स्तंभ ढासळल्याशिवाय राहणार नाही. पत्रकारांवर होणाऱ्या प्राणघातक हल्ल्याची महाराष्ट्रभरात तातडीने चौकशी करावी, तसेच गुन्हेगारांवर पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्ह्याची नोंद होऊन त्यांचेवर दखलपात्र गुन्ह्याची म्हणून नोंदी व्हाव्यात. हल्ला झालेल्या पत्रकारांना त्यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे.या मागणीसाठी आज लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष




पंजाबराव वर यांचे नेतृत्वात निवासी उपजिल्हाधिकारी रविंद्र पाटील यांना दिलेल्या निवेदनावर विभागीय संघटक संतोष धरमकर, साहित्यिक अर्जून घुगे, संघपाल शिरसाट, संतोष मोरे, प्रकाश जंजाळ, योगेश सिरसाट, अजय विजय वानखडे, अनुराग अभंग, गणेश सोनोने, विजय देशमुख, संजय निकस पाटील, दिपक तु. शिरसाट, डॉ. अशोक शिरसाट यांच्या सह्या आहेत.

## दागिने खरेदीची सुवर्णसंधी; आज स्वस्त झालं सोनं, २४ कॅरेटचे भाव पाहून ग्राहकांना दिलासा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सोनं-चांदीच्या दरात सातत्याने चढ-उतार होताना दिसत आहे. मागील आठवड्यात सोन्याने उच्चांकी दर गाठला होता. मात्र या आठवड्याच्या सुरुवातीलाच सोन्याचे दर कमी झाले आहेत. आज पुन्हा एकदा सोन्याच्या दरात सुस्ती दिसून आली आहे. सोमवारी ७ ऑक्टोबर रोजी वायदे बाजारात सोनं आणि चांदीच्या दरात घट झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातही सोनं डॉलरच्या तेजीमुळं नरमाई दिसून येत होते. डॉलरच्या मजबूतीमुळं सोनं १० डॉलरने घट होऊन २६७० डॉलरच्या आसपास स्थिरावले आहे. तर, चांदी ३२ डॉलरच्या वर स्थिरावली.

मागील आठवड्यात सोन्याच्या दरात मोठी वाढ झाली होती. आंतरराष्ट्रीय बाजारात घडणाऱ्या घडामोडींम



ुळं सोन्याच्या दारात सातत्याने चढ-उतार होत होते. मात्र आज ग्राहकांना थोडा दिलासा मिळाला आहे. सध्या नवरात्र सुरू आहे. काहीच दिवसांत दसरा येणार आहे. दसऱ्याच्या दिवसांत मोठ्या प्रमाणात मौल्यवान धातुची खरेदी केली जाते. त्यामुळं सोन्याचे दर वाढत असताना ग्राहकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

गुडरिटर्न्नुसार, आज २४ कॅरेट सोन्याचा दर २२० रुपयांनी घसरला आहे. त्यानुसार आज प्रतितोळा सोनं ७७,४५० रुपयांवर स्थिरावलं आहे. तर, २२ कॅरेट सोन्याचा दर २०० रुपयांनी घसरून ७१,००० रुपयांवर स्थिरावलं आहे. १८ कॅरेट सोन्याचे दर १७० रुपयांनी घसरून ५८ हजारांवर स्थिरावले आहे.

आज काय आहेत सोन्याचे भाव?

ग्रॅम सोनं किंमत

१० ग्रॅम २२ कॅरेट ७१,००० रुपये

१० ग्रॅम २४ कॅरेट ७७,४५० रुपये

१० ग्रॅम १८ कॅरेट ५८,०९० रुपये

ग्रॅम सोनं किंमत

१ ग्रॅम २२ कॅरेट ७,१०० रुपये

१ ग्रॅम २४ कॅरेट ७, ७४५ रुपये

१ ग्रॅम १८ कॅरेट ५, ८०९ रुपये

ग्रॅम सोनं किंमत

८ ग्रॅम २२ कॅरेट ५६,८०० रुपये

८ ग्रॅम २४ कॅरेट ६१,९६० रुपये

८ ग्रॅम १८ कॅरेट ४६,४७२ रुपये

मुंबई - पुण्यात कसे असतील सोन्याचे दर?

२२ कॅरेट- ७१,००० रुपये

२४ कॅरेट- ७७,४५० रुपये

१८ कॅरेट- ५८,०९० रुपये

## पाकिस्तानला लोळवलं पण टीम इंडियाची सेमीफायनलची वाट बिकट; गणित जुळणार का?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय महिला संघाने टी२० वर्ल्ड कपमध्ये पाकिस्तानला ६ विकेटने हरवलं. या विजयानंतरही भारतीय संघासमोर सेमीफायनल गाठण्याचं आव्हान आहे. भारतीय संघाला पाकिस्तानचा पराभव मोठ्या धावसंख्येने करण्याची गरज होती पण ते शक्य झालं नाही. यामुळे आता भारताला उर्वरित सामन्यात जास्ती जास्त विजय मिळवावा लागेल. याशिवाय न्यूझीलंड किंवा ऑस्ट्रेलिया यांचा मोठा पराभव होण्याची वाट बघावी लागेल. यामुळे रनरेटचं गणित सुटेल आणि भारताचं सेमीफायनलचं समीकरण जुळेल.

महिला टी२० वर्ल्ड कपमध्ये भारत सेमीफायनला पोहोचण्याची वाट आता रनरेटवर अवलंबून आहे. भारतीय महिला संघ टी२० वर्ल्ड कपमध्ये ग्रुप ए मध्ये आहे. या ग्रुपमध्ये ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, पाकिस्तान आणि श्रीलंकेचा संघ आहे. श्रीलंका वगळता इतर संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे. यामुळे भारत, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तानचे प्रत्येकी दोन गुण झाले आहेत. या ग्रुपमधील टॉपचे दोन संघ सेमीफायनलसाठी पात्र ठरतील.

ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडलने आतापर्यत प्रत्येकी एकच सामना खेळला आहे. भारत, पाकिस्तान आणि श्रीलंकेचे प्रत्येकी दोन सामने झाले आहेत. यात एक विजय आणि एक पराभव झाला आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड भक्कम स्थितीत आहेत. त्यापैकी एक संघ ८ गुणांपर्यंत पोहोचू शकतो. तर इतर संघ जास्ती जास्त ६ पॉइंट मिळवू शकतात.

भारतीय संघाला पहिल्या सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध पराभूत व्हावं लागलं. दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानला भारताने नमवलं. भारताला ६ गुण मिळवायचे असतील तर उर्वरित दोन सामने जिंकावे लागतील. भारताला आता ९ ऑक्टोबरला श्रीलंकेविरुद्ध, १३ ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळायचं आहे. यात एका सामन्यात जरी पराभव झाला तरी भारतीय संघाला जर-तरच्या समीकरणावर अवलंबून रहावं लागेल.

भारतीय संघाने श्रीलंका आणि ऑस्ट्रेलियाला हरवलं तर ६ गुण होतील. मात्र न्यूझीलंड किंवा ऑस्ट्रेलियाचे ६ पेक्षा जास्त गुण होण्याची शक्यताही आहे. अशा स्थितीत नेट रनरेटवर निर्णय होईल. भारत आणि पाकिस्तान यांच्यात रविवारी सामना झाला. पाकिस्तानने भारतासमोर १०६ धावांच आव्हान ठेवलं होतं. भारताने हे आव्हान १८.५ षटकात ५ विकेटच्या बदल्यात पूर्ण केलं. या विजयामुळे भारताला २ गुण मिळाले पण नेट रनरेट जास्त बदलला नाही. भारताने जर पाकिस्तानला ११ ते १२ षटकात हरवलं असतं तर रनरेट वाढला असता.

## हवेत उडाली बॅट, बाउंड्रीच्या बाहेर गेला बॉल... कुंफू पंड्याचा शॉट पाहून फिल्डरही चकित

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत विरुद्ध बांगलादेश यांच्यात तीन सामन्यांची टी २० सीरिज खेळवली जात असून यातील पहिला सामना ग्वालियार येथील नव्या क्रिकेट स्टेडियम वर खेळवण्यात आला. या सामन्यात सुरुवातीला अर्शदीप सिंह आणि वरुण चक्रवर्तीकच्या गोलंदाजी समोर बांगलादेशच्या टीमने गुडघे टेकले आणि १२७ वर ऑल आउट झाले. तर टीम इंडियाच्या विजयासाठी हार्दिक पंड्याने ३९ धावांची धमाकेदार केली. यावेळी त्याने मारलेला शॉट पाहून फिल्डरही चकित आले.

हार्दिकने हवेत बॅट फेकून मारला चौकार :

हार्दिक पंड्याने या सामन्यात उत्कृष्ट फलंदाजी केली. त्याने केवळ १६ बॉलमध्ये ३९ धावांची खेळी केली. यावेळी त्याने ५ चौकार आणि २ षटकार लगावले. हार्दिक यावेळी त्याच्या पूर्ण फॉर्मात बॅटिंग करत होता. यावेळी १२ व्या ओव्हरच्या चौथ्या बॉलवर वेगवान गोलंदाज तस्कीन अहमदने हार्दिकला फुलटॉस बॉल टाकला होता. या बॉलवर शॉट खेळताना हार्दिकच्या हातून बॅट सटकली आणि बॅट हवेत उडाली तर बॉल बॅटला लागून चौकार मिळण्याच्या दिशेने बाउंड्रीच्या बाहेर गेला.

फिल्डर बॅटकडेच पाहत राहिला :

शॉट मारताना हार्दिक पंड्याच्या हातून बॅट सटकली आणि हवेत उडाली. यावेळी बॅट स्क्वायर लेग अंपायर जवळ जाऊन पडली. तर बॉल बॅटला लागल्यावर बैकवर्ड पॉइंटच्या इथे गेली. इथे मेहदी हसन मिराज फील्डिंग करत होता. पण त्याचं लक्ष हे बॉल पेक्षा बॅटकडे जास्त होतं. तो पर्यत तो बॉल रोखण्यासाठी रिएक्ट करेल तटाच्या आधी बॉल बाउंड्री लाइन बाहेर गेला होता. त्यानंतर पुढच्या बॉलवर हार्दिकने पुन्हा सिक्स सामना जिंकवून दिला.

सामन्यात काय काय झालं?

टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. त्यामुळे बांगलादेशला प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरावे लागले. अर्शदीप सिंह आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी ३ विकेट्स आणि हार्दिक, मयंक आणि वॉशिंग्टन सुंदरने प्रत्येकी १ विकेट घेऊन बांगलादेशला १२७ वर ऑल आउट केले. टीम इंडियाला विजयासाठी १२८ धावांचे आव्हान मिळाले, यावेळी हार्दिक पंड्या (३९), संजू सॅमसन (२९) आणि कर्णधार सूर्यकुमार यादव (२९) धावांची खेळी केली. तर अभिषेक शर्मा आणि नितेश रेड्डी या दोघांनी प्रत्येकी १६ धावांची कामगिरी केली. टीम इंडियाने विजयासाठी मिळालेले १२८ धावांचे आव्हान अवघ्या ११.५ ओव्हरमध्ये पूर्ण केले.

# जागा वाटपाआधीच शिवसेना-भाजपात ठिणगी? क्षीरसागरांनी महाडिकांविरोधात शड्डू ठोकला!

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** राज्याची विधानसभा निवडणूक कधीही जाहीर होतील अशी शक्यता आहे. तर, दुसरीकडे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जागा वाटपाच्या चर्चा सुरू आहेत. राज्यातील नव्या आघाडी, युती समीकरणावरून जागा वाटपाआधीच स्थानिक पातळीवर वादाची ठिणगी पडू लागली आहे. कोल्हापूरमध्येही महायुतीत वादाचे फटाके फुटू लागले आहेत. शिवसेनेचे राजेश क्षीरसागर यांनी थेट महाडिक दावा सांगत असलेल्या मतदारसंघात मेळावा घेत



जागेवर दावा केला.

जागा वाटपावरून शिवसेना आणि भाजपमध्ये कोल्हापुरात चांगलीच जुंपली आहे. शिवसेनेचे नेते राजेश क्षीरसागर यांनी दक्षिण मतदारसंघात मेळावा घेऊन भाजपला आपली ताकद दाखवून दिली. त्यामुळे भाजप आणि शिवसेना शिंदे गटात संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे.

कोल्हापूरच्या उत्तर आणि दक्षिण मतदार संघाच्या जागेवरून भाजप आणि शिंदे गटात रस्सीखेच सुरू आहे. पारंपरिक दक्षिण मतदारसंघ भाजपने मागितला असून उत्तर मतदार संघावरही दावा केला आहे. खरंतर उत्तर मतदार संघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जातो. या मतदारसंघातून शिवसेनेचा आमदार निवडून येत असे. राजेश क्षीरसागर यांनीही दोन टर्म याच मतदार संघातून प्रतिनिधित्व केले. मात्र, २०१९ च्या निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारवा लागला.

भाजप आणि शिवसेना वेगळी झाल्यानंतर २०२१ च्या पोटनिवडणुकीत भाजपने या मतदारसंघात आपला उमेदवार दिला. त्यावेळपासून या मतदार संघावर भाजपने दावा केला आहे. या निवडणुकीतही भाजपने या मतदारसंघावर आपला दावा कायम ठेवला आहे. मात्र हा मतदारसंघ पारंपरिकरित्या शिवसेनेचा असून त्यावर क्षीरसागर यांनीही दावा केला आहे. मात्र खासदार धनंजय महाडिक हे मतदारसंघावरून आपला दावा सोडण्यास तयार नाही. त्यामुळे महाडिक यांचा बालेकिल्ला असलेल्या दक्षिण मतदार संघात मेळावा घेऊन राजेश क्षीरसागर यांनी त्यांना आव्हान दिले असल्याची चर्चा सुरू झाली आहे. एवढंच नाही तर उत्तर आणि दक्षिण मतदार संघात करोडोंचा निधी दिला असून त्यामुळे या दोन्हीही मतदार संघावर आपला दावा असल्याचं क्षीरसागर यांनी म्हंटले आहे. क्षीरसागर यांना सद्याच्या स्थितीत मतदारसंघ नसल्याने त्यांनी उत्तरमधून लढण्याची तयारी केली आहे. त्यामुळे या दोन्ही मतदार संघवरून चांगलाच संघर्ष निर्माण होणार असल्याची चर्चा आहे.

कोल्हापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात धनंजय महाडिक विरुद्ध सतेज पाटील यांच्यातील राजकीय चुरस दिसून आलेली आहे. २०१४ मध्ये या मतदारसंघातून भाजपकडून अमल महाडिक विजयी झाले होते. त्यानंतर २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेस उमेदवार आणि सतेज पाटील यांचे पुतणे ऋतुराज पाटील यांनी अमल महाडिक यांचा ४२ हजारांच्या मताधिक्याने पराभव केला होता.

## विविध वृत्त...

### रुग्णालय प्रशासनाच्या विरोधात वंचितचे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील सईबाई मोठे उपजिल्हा रुग्णालयामध्ये रुग्णांना सुविधा मिळत नसल्याने त्यांची हेळसांड होत आहे. यासाठी शेगाव शहर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने रुग्णालय प्रशासनाला याबाबत निवेदन देऊन इशारा देण्यात आला होता. मात्र आंदोलनाची दखल घेतल्या गेली नसल्याने आज सोमवारपासून रुग्णालयाच्या समोर वंचित कडून साखळी उपोषणा सुरुवात करण्यात आली आहे.

२०० बेडची मान्यता असलेल्या शेगाव येथील सईबाई मोठी उपजिल्हा रुग्णालयात २४ तास दिवस आणि रात्र गर्भवती महीलांचे सिजेरीयन रुग्णालयात होणे गरजेचे. खारपाणपट्यातील व किडणीग्रस्त रुग्णांसाठी २४ तास डायलेसीस सेवा सुरू राहणे आवश्यक आहे, याशिवाय शासनाच्या नियमात व अटीत बांधुन सोनोग्राफी मशीन सर्व गरजु लोकांसाठी उपलब्ध करुन देणे आणि रेफर टु अकोला हा प्रकार बंद करून हरणीया, अपेंडीक्स, मुळव्याध विविध सर्जरी करीता कायम स्वरुपी, कॉलबेसीस, जनरल सर्जन उपलब्ध करुन देवून सर्जरी दवाखान्यात करुन देण्यात यावी या मागणीच्या पूर्ततेसाठी आज संतनगरी शेगावात रुग्णालयासमोर वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष मोहम्मद सलमान यांच्या नेतृत्वात साखळी उपोषण आंदोलनात सुरुवात करण्यात आली.

### कोलवाई येथे सोयाबीनच्या गंजीला अज्ञात व्यक्तीने लावली आग



दैनिक आपला विदर्भ

■ ईश्वर राठोड

**यवतमाळ :** तालुक्यातील कोलवाई येथील महिला शेतकऱ्याने शेतात काढून ठेवलेल्या सोयाबीनच्या गंजीला रविवारी रात्री आग लागल्याने सोयाबीनची गंजी जळुन खाक झाली. यात शेतकऱ्याचे दोन ते अडीच लाखांचे नुकसान झाले आहे. दारव्हा तालुक्यातील कोलवाई येथील महिला शेतकरी दिपाली कांबळे (३७ वर्ष)रा.कोलवाई यांनी आपल्या कडे असलेल्या शेतात सोयाबीन काढून गंजी लावून ठेवली होती. रविवार ६ ऑक्टोंबर रोजी रात्री ८ वाजण्याच्या दरम्यान या गंजीस आग लागल्याने गंजी जळून खाक झाली.फिर्यादी शेतकरी दिपाली कांबळे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी नोंद केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक विलास कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली दारव्हा पोलिस करीत आहे.

### डाक विभागाचा उपक्रम; आर्थिक सक्षमीकरणाकरीता शक्ती उत्सव मोहिम

**बुलडाणा/प्रतिनिधी :** भारतीय डाक विभागामार्फत ग्राहकांसाठी आर्थिक सबलीकरण अंतर्गत विविध योजना राबविण्यात येतात. याचाच एक भाग म्हणून ऑक्टोंबर महिण्याच्या कालावधीत नवरात्री आणि दसऱ्याच्या शुभ पर्वावर नागरिकांच्या आर्थिक सक्षमीकरणाकरीता 'शक्ती उत्सव' विशेष मोहीम सुरु करण्यात आली आहे. क्षेत्रीय कार्यालय, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली बुलडाणा विभागात विविध ठिकाणी मेळाव्यांचे आयोजन करून पीओएसबी खाते काढण्यात येणार आहेत. यामध्ये आवर्ती ठेव योजना, मुलींकरिता सुकन्या समृद्धी योजना, महिलांकरिता महिला सम्मान बचत प्रमाणपत्र योजना, मासिक उत्पन्न योजना, जेष्ठ नागरीकांसाठी जेष्ठ नागरिक बचत योजना, पदवीधर तसेच शासकीय-निम शासकीय कर्मचारी यांना डाक जीवन बिमा व ग्रामीण भागातील रहिवासी करिता ग्रामीण डाक जीवन बिमा राबविल्या जातात. या विविध सेवाचा जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी जवळच्या डाक घराशी संपर्क साधून लाभ घ्यावा, असे आवाहन डाक अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे.

### रतन टाटा यांची प्रकृती बिघडली, ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरु

**मुंबई/प्रतिनिधी :** उद्योगपती रतन टाटा यांना प्रकृती बिघडल्यानं रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. त्यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णलयात उपचार केले जात आहेत. ते आयसीयूमध्ये असून अद्याप प्रकृतीबाबत काही अपडेट समोर आलेले नाहीत. टाटा सन्सचे माजी अध्यक्ष असलेल्या रतन टाटा यांचं वय ८६ वर्षे इतकं आहे. रात्री त्यांना रुग्णालयात आणलं आहे.

# ज्यांच्या सोबत संघर्ष केला त्यांच्यासोबतच उद्धव ठाकरे बसले

■ केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची उद्धव ठाकरे यांच्यावर टीका :

■ हात दाखवा मुख्यमंत्र्यांना थांबवा गोरगरिबांचा मुख्यमंत्री, शिंदे

■ मेहकर येथे जनसंवाद यात्रा संपन्न





दैनिक आपला विदर्भ


**मेहकर/प्रतिनिधी :** बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाचा विचार घेऊन संपूर्ण महाराष्ट्रात शिवसेना पोहोचवली. शिवसैनिक तयार केले. तेव्हापासून मी शिवसेनेत आहे.मात्र उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या स्वार्थापोटी हिंदुत्वा ला बगल देत ज्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस सोबत संघर्ष केला. त्यांच्यासोबतच आपल्या स्वार्थासाठी जाऊन बसले,अशी टीका केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली. ते मेहकर येथे आयोजित जनसंवाद यात्रेत मार्गदर्शन करताना बोलत होते.

जनसंवाद यात्रेला अजय चौधरी, शिवसेना नेते संजय निरूपम, आ.संजय रायमुलकर खा. श्रीकांत शिंदे, जिल्हाध्यक्ष बळीराम मापारी, जिल्हाध्यक्ष राजपूत यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व शिवसेना महिला पदाधिकाऱ्यांची उपस्थितीत होते. यावेळी पुढे बोलताना केंद्रीय राज्यमंत्री म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत मोठा उठाव झाला. यामध्ये ५४ आमदारातील ४० आमदार हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत आले. १८ खासदारांपैकी व१२ खासदार या उठावात सहभागी झाले. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी भाजप शिवसेना युती करून २०१९ ची निवडणूक लढवली होती. या निवडणुकीतूनच जनतेने भाजप सेनेला कौल दिला होता. तसेच उद्धव ठाकरे यांनी सर्वसामान्य शिवसैनिकांना मुख्यमंत्री करेल असे ठणकावून सांगितले होते. मात्र उद्धव ठाकरे यांनी आपले शब्द न पाळता ज्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस सोबत गेल्या अनेक वर्षापासून संघर्ष केला. त्यांच्या विरोधात उभे राहिलो त्यांच्यासोबतच मांडीला मांडी लावून सत्ता स्थापन केली. सत्ता आल्यानंतरही शिवसैनिकांना न्याय मिळाला नाही, खासदारांची कामे झाले नाहीत, आमदारांच्या कोणत्या फाईलवर सही केली नाही, केवळ घरात बसून अडीच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केला, त्यामुळे शिवसैनिक व शिवसेनेचे आमदार, खासदार यांच्या भावना दुखावल्या. उद्धव ठाकरे यांच्या या वागण्याबाबत अनेक वेळा त्यांना समजावण्याचा प्रयत्नही करण्यात आला. मात्र याकडे त्यांनी दुर्लक्ष केले केवळ काही लोकांच्या मनानुसार ऐकून त्यांनी शिवसैनिक व शिवसेनेचे आमदार खासदार यांना दूर केले. शिवसेनेचे खासदार, आमदार यांचे कामे न झाल्यानंतर वारंवार सांगून यामध्ये सुधारणा करण्याची मागणी केली. मात्र या सर्वांकडे मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांनी दुर्लक्ष केले. सर्वसामान्यांचे कामे होत नसल्याने मनात निर्माण झालेल्या भावनेतून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात उठाव झाला. त्यावेळेस ४० आमदार हे शिवसेनेसोबत गेले. तर १२ खासदारांनी सुद्धा एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दिला. यासह संपूर्ण राज्यातील जिल्हाप्रमुख शिवसेना पदाधिकारी अशा जवळपास ८० टक्के पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाणे पसंत केले. मुख्यमंत्री यांना शिवसेनेचे नेते केले त्यांच्या नेतृत्वात भाजप सेनेचे सरकार स्थापन केले. मुख्यमंत्री होताच एकनाथ शिंदे यांनी विविध योजना राबवून सर्वसामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. सोनार समाज आर्थिक विकास महामंडळ, जैन, सुतार, अशा अनेक समाजासाठी महामंडळ स्थापन केले.अनेक योजना राबविल्या आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना राबवून महिलांना आर्थिक सक्षम करण्याचे काम केले आहे. शेतकऱ्यांना एक रुपयात पिक विम्याचा लाभ देण्याचे काम केले आहे. मुस्लिम समाजांना सुद्धा शादीखाना, कब्रस्तान आदी विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. मतदार संघात आतापर्यंत सर्वात जास्त निधी हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. मेहकर मतदार संघ हा शिवसेनेचा कायम बालेकिल्ला राहिला आहे. यावेळेसही शिवसेनेचा बालेकिल्ला कायम ठेवून महाराष्ट्रातील सर्वात जास्त मतांनी या मतदार संघातील उमेदवार निवडून आणायचा पराक्रम आपल्याला करायचा आहे. त्यासाठी शिवसैनिकांनी आपले हवेदावे बाजुला ठेवून शिवसेनेला मतदान करावे,शिवसेनेच्या उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन केले.

### हात दाखवा मुख्यमंत्र्यांना थांबवा

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सर्वसामान्यांचे गोरगरिबांचे मुख्यमंत्री आहेत. महाराष्ट्रात असा गोरगरिबांच्या समस्या व भावना जाणणारा एकनाथ शिंदे हे एकमेव मुख्यमंत्री आहेत.सर्वसामान्य गोरगरिबाबरोबरच मुख्यमंत्र्यांना चक्क लहान मुलांना हात दाखवून गाडी थांबवायचा इशारा केला असता मुख्यमंत्र्यांनी सर्व ताफा थांबून त्या लहान मुलांसोबत संवाद साधला.असे गोरगरिबांचे कैवारी म्हणून एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री लाभले आहेत. येणाऱ्या पुढील काळातही शिवसेनेसोबत आपण तन-मन-धनाने राहून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा सत्ता स्थापन करावी, शिवसेनेच्या उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करावे ,असे आवाहन खा. श्रीकांत शिंदे यांनी केले. तसेच यावेळी आमदार संजय रायमुलकर यांच्यासह विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# भर जहा. येथील जगदंबा माता मंदिरात भाविकांची मांदियाळी



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/ प्रतिनिधी** :तालुक्यातील रिसोड ते लोणार मार्गावर असलेल्या आसरा माता संस्थांवर जगदंबा माता नवरात्र उत्सवाला ३ ऑक्टोबर पासुन प्रारंभ झाला आहे.या दरम्यान पंचक्रोशीतील भाविक भक्तांची मोठी गर्दी असते. दररोज सकाळी चार वाजल्यापासून महिला सहभागी भक्तांची मोठी गर्दी असते या ठिकाणी काही विपरीत घडनार नाही.याची दक्षता म्हणुन एस.जी. कंस्ट्रक्शन चे मालक सुधीरभाऊ देशमुख यांनी सिसिटीव्ही कॅमेर बसुन भावीकांच्या सुरक्षेत वाढ केली आहे. भर जहागीर येथिल आसरा माता संस्थान आणि जगदंबा माता संस्थानच्या सर्वांगीण विकासाठी लाखो रूपये खर्च करीत विकास कामे एस.जी.जाधव कन्ट्रक्शन चे मालक सुधीर जाधव यांनी पुढाकार घेतलेला आहे.जगदंबा संस्थान व आसरा माता मंदिराचा विकास कामांसाठी कोट्यावधीचा खर्च केले असुन त्यांच्या कल्पनेतुन मंदिर परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.यावर्षी नवरात्र काळामध्ये भाविक भक्तांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर राहणार आसल्याने भावीकांच्या सुरक्षेवर तीस-या डोळ्याची नजर आसनार आहे. तसेच मंदिराच्या जिनर्णोधारासाठी सुधीर जाधव यांनी राजस्थान येथील नामांकित शिल्पकारांच्या माध्यमातून मंदिराचा जीर्णोद्धार केला आहे, यामुळे आसरा माता संस्थांवर नवरात्र व इतर दिवशीही भावीक भक्तांची मोठी गर्दी दिसुन येते तसेच या संस्थांवर परिसरामधील महाविद्यालयीन विद्यार्थी व पर्यटकांची गर्दी दिवसेंदिवस वाढत जात असून संस्थांच्या वतीने योग्य ते नियोजन करून भाविक भक्तांना दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले आहे. या महामार्गावर अपघाताचे प्रमाण पाहता सुधीर जाधव यांनी सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्याचा संकल्प घेतला असुन तो संकल्प त्यांनी पुर्ण केला आहे. संस्थांच्या सर्वागीण विकासा मध्ये भर पडावी म्हणुन नव्याने भक्तनिवासाच्या बांधकामाला प्रारंभ केला आहे. त्यामुळे येथिल संस्थानवर भावीका साठी मोठ्या प्रमाणावर सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

**रिसोड लोणार या महामार्गावर रिसोड पासून आठ ते दहा किलोमीटर अंतरावर रस्त्यालगत एका मोठ्या तलावामध्ये जगदंबा मातेचे मंदिर आहे यावर्षी पावसाळा भरपूर झाल्यामुळे मंदिराचे दृश्यय मनमोहक व लक्षवेधक झाले आहे या परिसराला नवरात्र उत्सव काळात यात्रेचे स्वरूप प्राप्त होते.**

### पारधी समाजाच्या विकासासाठी विविध योजना; १६ ऑक्टोंबरपर्यंत योजनांच्या लाभासाठी अर्ज मागविले

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामार्फत जिल्हा वार्षीक आदिवासी घटक कार्यक्रम योजनेअंतर्गत सन २०२३-२४ या वर्षात पारधी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात येत आहे. त्यात २० पारधी/फासेपारधी समाजाच्या लाभार्थ्यांच्या घरी पारेषण संलग्न सौर ऊर्जा निर्मिती नेट मिटरिंगसह बसवूण देण्याचे लाभ देण्यात येणार आहे. योजनेचा लाभ घेण्याकरीता पारधी किंवा फासेपारधी समाजाच्या जमातीच्या लाभार्थ्यांनी १६ ऑक्टोंबरपर्यंत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प येथे कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावा. योजनेचा छापील अर्ज लाभार्थ्यांना विनामुल्य देण्यात येईल. तसेच मुदतीनंतर प्राप्त अर्ज स्विकारण्यात येणार नाही यांची सर्व लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी,असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी,अकोला यांनी कळविले आहे.

आवश्यक कागदपत्रे : पारधी/फासेपारधी जमाती जातीचा दाखला प्रमाणपत्र, आधारकार्ड, बँक खाते क्रमांक, दारिद्र्रेषेचे प्रमाणपत्र असल्यास, तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी दाखला रेशनकार्ड, विधवा महिला असल्यास पतीचे मृत्यू प्रमाणपत्र, दिव्यांग असल्यास प्रमाणपत्र, परितक्त्या असल्यास नोटरी पुरावा, शैक्षणीक पात्रता शाळा सोडल्याचा दाखला, पासपोर्ट साईज दोन फोटो, इमारतीचा प्रकार आरसीसी किंवा स्लॅब किंवा टिनशेड बांधकामचा नकाशा. इमारतीची जागा स्वमालकीची असावी, नमुना ८ अ किंवा या आधी सौर प्रकल्प आस्थापीत आहे किंवा नाही. इमारतीची ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका कर पावती जोडवी. स्वताचे नावावर असलेले इलेक्ट्रीक बिलाची छायांकित प्रत.

### किरकोळ वादातून स्क्रू ड्रायव्हरनं वार; रिक्षा चालकाच्या हत्येनं पुणे हादरलं

**पुणे/ प्रतिनिधी :** पिंपरी चिंचवडमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. स्क्रू ड्रायव्हरनं वार करून एका रिक्षा चालकाची हत्या करण्यात आली आहे. किरकोळ वादातून ही घटना घडल्याची माहिती समोर येत आहे. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे.

# अकोल्यात दोन गटात वाद; दगडफेक, वाहनांची जाळपोळ

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/ प्रतिनिधी :** जुने शहर येथील हरिहरपेठ भागात किरकोळ कारणावरून दोन गटात मोठा वाद झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. या वादातून तुफान दगडफेक करण्यात आली. एक ऑटो रिक्षा व तीन दुचाकी वाहनांची जाळपोळ करण्यात आली आहे. पोलिसांनी घटनास्थळावर चोख बंदोबस्त तैनात केला असून संचारबंदी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरात तणावपूर्ण शांतता आहे. कुठल्याही अफवांवर विश्र्वास न ठेवण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

प्राप्त माहितीनुसार, जुने शहरातील हरिहरपेठ भागात ऑटो रिक्षाचा एका दुचाकीला धक्का लागला. या कारणावरून दोन्ही चालकांमध्ये बाचाबाची झाली. त्याचे मोठ्या वादात पर्यवसान झाले. या वादावरून गाडगे नगर व हमजा प्लॉट येथील दोन मोठे गट आमने-सामने आले. वाद आणखी वाढल्याने दोन्ही बाजूने तुफान दगडफेक करण्यात आली. यामुळे घटनास्थळी दगडचा खच पडला आहे. त्यानंतर संतप्त जमावाने एका ऑटो रिक्षा व तीन दुचाकीला आग लावली. या आगीमध्ये चारही वाहने जळून खाक झाली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. जमावाला पांगवण्यासाठी सौम्य लाठीमार करण्यात आला. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आली. घटनास्थळ व परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. जुने शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. नागरिकांनी अफवांवर विश्र्वास ठेऊ नये, शहरात शांतता आहे, असे आवाहन अकोला पोलिसांनी केले आहे.



**जुने शहर अत्यंत संवेदनशील**

अकोल्यातील जुने शहर हा भाग अत्यंत संवेदनशील म्हणून ओळखला जातो. यापूर्वी समाजमाध्यमावरील एका आक्षेपार्ह पोस्टच्या कारणावरून १३ मे २०२३ रोजी शहरात दंगल उसळली होती. त्यात एकाचा बळी गेला, तर १० जण जखमी झाले होते. या प्रकरणी जुने शहर व रामदास पेठ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करून १५० हून अधिक आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यानंतर ही जुने शहर भागात अनेक वेळा तणावाची परिस्थिती निर्माण झाली. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. आज घडलेल्या वादावरून परिसरात शांतता ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आमदार रणधीर सावरकर यांनी घटनास्थळ गाठून परिस्थितीची संपूर्ण माहिती घेतली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना देखील घटनेबाबत अवगत करण्यात आले आहे.